N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस निरीक्षक रोहा पोलीस ठाणे

## FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

**प्रथम खबर अहवाल**

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** रायगड **P.S.(ठाणे):** रोहा **Year (वर्ष):** 2024

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0060 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/03/2024 01:57 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 07/03/2024

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 07/03/2024

**Time From (वेळेपासून):** 15:40 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:40 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/03/2024 **Time (वेळ):** 01:57 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 003 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/03/2024 01:57 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** मौजे रोहा बाजारपेठेतील तीनबती,नाका येथील पोलीस वाहतुक चौकीचे

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री.अजिंक्य कांतीलाल वाघमारे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1997 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा डबीर मार्केट बिल्डींग,रुम ,नं202, प्राईड हॉटेलच्या समोर,रोहा,रायगड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा डबीर मार्केट बिल्डींग,रुम ,नं202, प्राईड हॉटेलच्या समोर,रोहा,रायगड,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-8149917024**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.गोविंद रघुनाथ मदगे सहायक पोलीस उपनिरीक्षक | | | 1. नेमणूक- रोहा पोलीस ठाणे,रा खारी, श्री देशमुख ,यांची चाळ, ता रोहा,रोहा, रायगड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 6,000/ रूपये रोख रक्कम | 6,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 6,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

प्रथम खबर अहवाल रोहा
दिनांक 08/03/2024

मी श्री. अजिंक्य कांतीलाल वाघमारे, वय 27 वर्षे, रा.डबीर मार्केट बिल्डींग, रूम नं.202, प्राईड हॉटेलच्या समोर रोहा, ता.रोहा, जि. रायगड. मो.नं. 7057277756 समक्ष रोहा पोलीस ठाणे येथे हजर राहून खबर लिहून देतो की,

मी वरीलप्रमाणे असून वर नमूद ठिकाणी सन 2005 पासून कुटुबियांसह राहावयास आहे. माझे कुटुंबात माझे वडिल कांतीलाल तुकाराम वाघमारे, वय-59 वर्षे, माझी आई प्रविणा कांतीलाल वाघमारे, वय-46 वर्षे, भाउ अमित कांतीलाल वाघमारे, वय-24 वर्षे, दोन बहिणी अनुष्का कांतीलाल वाघमारे, वय-20 वर्षे, देवश्री कांतीलाल वाघमारे, वय-17 वर्षे असे सदस्य आहेत. मी फार्मासिस्ट या पदावार एम.पी.सी.टी. रूग्णालय, सानपाडा, सेक्टर 4, नवी मुंबई येथे नोकरीस आहे.

दि. 04/03/2024 रोजी 08.30 वा. माझे वर नमुद राहते घरी आई वडील यांचा किरकोळ वाद झाला होता. माझे वडिलांना तीन वर्षापुर्वी पॅरालिसीस झालेला असल्यामुळे ते नेहमी तणावात असतात. आजारपणामुळे त्रस्त असल्यामुळे माझे आई वडीलांचा आपसात वाद झाला होता. त्यावेळी मी कामावर गेलेलो होतो व घरी देखील कोणीही नव्हते. घरात कोणीही समजावणारे नसल्यामुळे माझे वडिल दि.04/03/2024 रोजी रोहा पोलीस ठाणे येथे जाऊन माझे आईची तक्रार केली होती. त्यावेळी रोहा पोलीस ठाणे येथे कर्तव्यावरील पोलीस श्री. मदगे यांनी माझे वडिलांची माझे आईविरूध्द तक्रार नोंदवली असल्याचे मला माझे वडिलांकडून कळाले. सदर प्रकरण कळल्यानंतर मी रोहा पोलीस ठाणे येथे गेलो असता त्या ठिकाणी पोलीस श्री. मदगे हे रोहा पोलीस ठाण्यास युनिफॉर्ममध्ये हजर होते. पोलीस श्री. मदगे यांनी, माझे आईला अटक करावी लागेल असे मला सांगून घाबरवून सोडले. त्यानंतर काही वेळाने सदर प्रकरण मिटविण्यासाठी माझेकडे दि. 04/03/2024 रोजी रक्कम रू. 10,000/- ची मागणी केली. त्यानंतर श्री. मदगे यांनी प्रकरण मिटवण्यासाठी पैशाची व्यवस्था करून मला एक दोन दिवसांत रोहा पोलीस ठाणे येथे येउन भेटायला सांगितले. त्यानंतर मी माझे कुटुंबियांसह रोहा पोलीस ठाणे येथून निघून गेलो. मला श्री. मदगे यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने लाच मागणी प्रकरणी श्री.मदगे, रोहा पोलीस ठाणे यांचेविरूध्द कारवाई होणेकरीता मी दिनांक 06/03/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांचेकडे तक्रार दिली. मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 07/03/2024 रोजी पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास त्यानंतर त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा

आजमाविण्यात येईल बाबत सुचना देवुन मला दिनांक 07/03/2024 रोजी रोहा तालुक्यातील मौजे झोळांबे येथे हजर रहाण्याबाबत सुचना दिल्या.

माझे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 07/03/2024 रोजी 12.30 वा.चे सुमारास पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे हे मौजे झोळांबे गावचे हद्दीत रोहा रामराज रोडचे बाजूला मोकळ्या ठिकाणी सापळा पथकासह व दोन शासकीय पंच 1)श्री.प्रशांत अर्जुन सोनवणे, वनरक्षक वडखळ, वनपरिक्षेत्र वडखळ, पंच 2) श्री.दुष्यंत पंकज मराठे, वनरक्षक कोलेटी, वनपरिक्षेत्र नागोठणे यांचेसह हजर झाले. पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांनी त्यांचेशी ओळख करून दिली. तसेच पथकातील अंमलदार यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांनी मला सांगितले की, मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास त्यानंतर त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आजमाविण्यात येईल बाबत सुचना दिल्या.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांनी पडताळणीचे कार्यवाहीबाबत आम्हास व पंचांस माहिती देवून योग्य त्या सूचना दिल्या. त्याप्रमाणे 13.00 वा. माझी व पंचांची वक्तव्य डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे यांनी पडताळणीकरीता खाजगी इर्टींगा कार क्रमांक एमएच 06-बीएम-4266 या वाहनाने पंच नं. 1 श्री.प्रशांत सोनवणे यांचेसह लोकसेवक श्री. मदगे, रोहा पोलीस ठाणे यांना भेटणेकरीता रोहा पोलीस ठाणे येथे जाण्याच्या सुचना दिल्या.

त्याप्रमाणे मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी सुमारे 13.06 वाजता माझेकडे व्हाईस रेकॉर्डर सुरू करून देण्यात आले. खाजगी इर्टींगा कार क्रमांक एमएच 06-बीएम-4266 या वाहनाने पंच नं. 1 श्री. प्रशांत सोनवणे यांचेसह रोहा पोलीस ठाणेमध्ये गेलो. तेथे लोकसेवक श्री.मदगे, हे पोलीस युनिफॉर्ममध्ये हजर होते. मी त्यांची भेट घेतली व 'तुम्ही बोलल्याप्रमाणे आलोय.' असं बोलल्यानंतर 'तु पाचला अँग्री झाला होतास. मी तुला दहा सांगीतले होते. आलं का लक्षात? आता काय तडजोड कर. काय करायचं ते कर मला. हां की नाय.' असे म्हणून श्री.मदगे यांनी त्यांचे दोन हात समोर करून सहा बोटे दाखवून 6,000/- रूपयेची लाच देणेबाबत इशारा करून लाचेची मागणी केली. त्यानंतर मी आणि पंच श्री. प्रशांत सोनवणे असे खाजगी इर्टींगा कारने सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. सदरचे समक्ष भेटीतील संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. पाडावे यांनी सदर संभाषणावरून लोकसेवक श्री. मदगे यांनी तक्रारदार यांच्या आईविरूध्द दाखल प्रकरणामध्ये मदत करणेसाठी प्रथम 10,000/- रूपये व तडजोडीअंती 6,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले असल्याने लोकसेवक श्री.मदगे यांच्याविरूध्द लाचेचा सापळा आजमाविण्याचे ठरवुन लाचेची रक्कम रूपये 6,000/- रूपये देणेबाबत मला सुचना दिल्या. त्याप्रमाणे माझे कडील 500/-रू.दराच्या 12 नोटा असे 6,000/- रूपये सापळा कारवाईकरीता पोलीस उप अधीक्षक श्री. पाडावे यांचेकडे हजर केल्या. त्यानंतर सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही करण्यात आली. त्यामध्ये मला व पंचाना अँन्थ्रॉसिन पावडर लावण्याचे प्रात्यक्षीक करून दाखविले.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक शशीकांत पाडावे यांनी मला, पंचाना, पथकातील अंमलदार यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.उप अधीक्षक श्री.पाडावे यांनी 15-00 वाजता माझी व पंचाची वक्तव्ये डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतली. तसेच माझेकडे अँथ्रासीन पावडर लावलेले लाचेची रक्कम 6,000/- रूपये माझे शर्टाचे समोरील डावे खिशामध्ये ठेवुन डिजिटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो होल्डवर ठेवून माझे पॅन्टचे समोरील डावे खिशात ठेवून दिला.

त्यानंतर खाजगी इर्टींगा गाडी नं.एमएच 06- बीएम-4266 मध्ये पोलीस उप अधीक्षक श्री.पाडावे, मी तसेच सफौ.जाधव, पोह/महेश पाटील, पोह/कौस्तुभ मगर पंच श्री.प्रशांत सोनवणे, पंच श्री.दुष्यंत मराठे, चालक श्री.सुरज शरद थळे असे आम्ही सर्व जण 15-15 वाजता झोळांबे येथून रोहा पोलीस ठाणे येथे रवाना झालो. रोहा पोलीस ठाणेचे आवाराच्या बाहेरील रस्त्यावर आल्यानंतर वाहन रस्त्याच्या कडेला उभे केले. त्यानंतर पो.उप अधीक्षक श्री. पाडावे यांनी मला व पंच नं. 1 श्री. सोनवणे यांना कारमधून उतरून रोहा पोलीस ठाणे इमारतीमध्ये जाण्याचा इशारा केला. त्याप्रमाणे मी व पंच नंबर 1 श्री. सोनवणे असे इर्टीगा कारमधून उतरून रोहा पोलीस ठाणे इमारतीकडे पायी चालत गेलो. आमचे मागोमाग पो.उप अधीक्षक श्री. पाडावे सापळा पथकातील अधिकारी/अंमलदार व पंच नं.2 श्री.मराठे असे वाहनातून उतरून रोहा पोलीस ठाणेच्या आजुबाजुचे परिसरात कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा रचून थांबून राहीले.

मी व पंच नं. 1 श्री. सोनवणे असे रोहा पोलीस ठाणेमध्ये गेलो. परंतू पोलीस श्री.मदगे हे पोलीस ठाणेमध्ये दिसून आले नाहीत. म्हणून मी पोलीस ठाणेच्या बाहेर येऊन माझा मोबाईल नं.9529390503 वरून पोलीस श्री.मदगे यांचा मोबाईल क्र.9921538127 वर कॉल करून मी पोलीस स्टेशनला आलेलो असल्याचे कळवीले. त्यावेळी त्यांनी ''ठिक आहे.'' असे मला सांगीतले. मी पोलीस स्टेशनच्या समोर थांबून राहीलो. थोड्याच वेळात पोलीस श्री.मदगे हे मोटारसायकलने रोहा पोलीस स्टेशन आवारात आले व मला त्यांचे मागे मोटारसाकलवर बसण्यास सांगून रोहा पोलीस ठाणे आवारातून बाहेर निघून बाजारपेठेकडे निघाले. लागलीच पोलीस उपअधीक्षक श्री.पाडावे, सापळा पथक दोन्ही पंचांसह खाजगी इर्टीगा गाडी नं.एमएच 06-बीएम-4266 मध्ये पुन्हा बसून आमचे मागे काही अंतर राखून इर्टीगा गाडीने आमच्या पाठोपाठ येवू लागले. श्री. मदगे यांनी मोटारसायकल रोहा बाजारपेठेतील तीनबत्ती नाका येथील पोलीस वाहतूक चैकीचे बाजूला थांबवली. त्याचवेळी मागे थोड्याच अंतरावर खाजगी इर्टीगा गाडी नं.एमएच 06-बीएम-4266 थांबली व त्यातून अधिकारी, अंमलदार व पंच खाली उतरून पोलीस वाहतूक चैकीच्या आसपास येऊन अंतराअंतरावर थांबले. श्री.मदगे व मी मोटार सायकलवरून खाली उतरलो असता श्री. मदगे यांनी मला पोलीस वाहतूक चैकीच्या पुर्व बाजूच्या भिंतीजवळ नेवून माझेकडे लाचेची मागणी केली. त्यांनी मागणी केलेले 6,000/-रूपये लाचेची रक्कम मी लोकसेवक श्री. मदगे यांचेकडे दिली. ती लोकसेवक श्री.मदगे यांनी पोलीस युनिफॉर्मच्या त्यांचे पॅन्टच्या समोरील उजव्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मी थोडा बाजूला येवून ही घटना प्रत्यक्ष पहात असलेल्या पंच व सापळा पथकास माझे डाव्या हाताने माझ्या शर्टची कॉलर पकडून 3 वेळा वर ओढून लोकसेवक श्री.मदगे यांनी लाचेची रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजित इशारा केला. त्यावेळी सुमारे 15.40 वाजण्याचे सुमारांस अँन्टी करप्शन पथकाने लोकसेवक श्री.मदगे यांना रंगेहाथ पकडले.

अशा रितीने रोहा पोलीस ठाणे येथे माझे आईविरूध्द दाखल असलेल्या अदखलपात्र गुन्हयामध्ये आईला अटक न करणेकरीता व सदर प्रकरणी मदत करणेकरीता दिनांक 07/03/2024 रोजी पडताळणी दरम्यान पंचासमक्ष त्यांचे रोहा पोलीस ठाणे येथे प्रथम 10,000/- रूपये व तडजोडीअंती 6,000/- रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले व दिनांक 07/03/2024 रोजी 15.40 वाजता माझेकडून रोहा बाजारपेठेतील तीनबत्ती नाका येथील पोलीस वाहतूक चैकीचे बाजूला पंच साक्षीदारांसमक्ष लोकसेवक श्री.गोविंद रघुनाथ मदगे, सहायक पोलीस उपनिरीक्षक, रोहा पोलीस ठाणे यांनी 6,000/- रू.लाचेची रक्कम स्विकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले. त्यांचेकडून लाचेची रक्कम रू. 6,000/- हस्तगत करण्यात आलेली आहे.

म्हणुन माझी श्री.गोविंद रघुनाथ मदगे, वय 54 वर्षे, सहायक पोलीस उपनिरीक्षक, नेमणूक- रोहा पोलीस ठाणे, सध्या रा. खारी, श्री. देशमुख यांची चाळ, ता.रोहा, जि.रायगड. मुळ रा. मु.पो.नांदगांव, आदिवासीवाडीचे जवळ ता.कर्जत जि.रायगड यांचेविरूध्द फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली,

सही दि. /03/2024

( अजिंक्य कांतीलाल वाघमारे )

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): DEVIDAS BALAJIRAO MUPDE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

UHC190

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): DEVIDAS BALAJIRAO MUPDE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**